**प्रेसनोट** **दि.१५/०८/२०१९**

## बिबवेवाडी पोलीस ठाणे,पुणे शहर

## सी.सी.टि.व्ही कॅमेरे बसविले बाबत

मा.पोलीस आयुक्त साो,पुणे शहर यांचे सुरक्षित पुणे संकल्पनेतुन पुणे शहरात सी.सी.टी.व्ही.वॉच या उपक्रमामधुन बिबवेवाडी पोलीस ठाणेस माननीय नगरसेवक,सामाजिक कार्यकर्ते, धार्मिक स्थळांचे ट्रस्टी, हॉटेल मालक, व्यापारी यांची बैठक घेवुन त्यांना त्यांचे सुरक्षेसाठी सी.सी.टी.व्हि.कॅमेरे बसविण्यास आवहान केल्याने त्या अनुषंगाने दि.१५/०८/२०१९ रोजी स्वातंत्र्य दिनाचे अवचित्त साधुन शेळके वस्ती बिबवेवाडी येथे मा. सौ. रुपालीताई धाडवे पुणे मनपा नगरसेविका यांचे लोकसहभागातुन शेळके वस्तीचे अंतर्गत रोडचे दिशेने एकुण ०८ कॅमेरे बसवण्यात आले आहे. सी.सी.टी.व्हि.कॅमेरेचे उद्‌घाटन प्रसंगी श्री मुरलीधर करपे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बिबवेवाडी पोलीस ठाणे यांनी उपस्थितांना मार्गदर्शनपर बोलताना कम्युनिटिंग पोलीसिंगच्या संदर्भाने बडी कॉप,भरोसा सेल, व सेवा ॲप बाबत माहिती दिली. तसेच आपले घराच्या व व्यवसायाचे ठिकाणी सी.सी.टि.व्हि.बसवण्याचे आवहान केले आहे.

सदर कार्यक्रमास श्री मुरलीधर करपे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,बिबवेवाडी पोलीस ठाणे, व मा. सौ. रुपालीताई धाडवे पुणे मनपा नगरसेविका, सामाजिक कार्यकर्ते श्री दिनेश धाडवे तसेच २० ते २५ कार्यकर्ते व बिबवेवाडी पोलीस ठाणेचे पोलीस हवालदार तणपुरे, पोलीस हवालदार दभडे, पोलीस शिपाई ढोपे, गुजर असे हजर होते.



